# १) सुहासिआइं

गाथासप्तशती हा महाराष्ट्री प्राकृतमध्ये रचलेला आद्य ग्रंथ आहे. सातवाहन कुळातील राजा हाल याने गाथासप्तशती संपादित केली आहे असे मानले जाते. इसवी सनाचे पहिले शतक हा हाल राजाचा काळ मानला जातो. सातवाहन कुळाचा प्राकृतभाषेकडे ओढा होता. त्यामुळे प्राकृत भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले.

गाथासप्तशती हा मुक्तककाव्य या प्रकारातील गाथासंग्रह आहे. या गाथा मुख्यत्वेकरून ग्रामवासियांकडून एकत्रित केल्यामुळे यामध्ये सर्वसामान्य जनतेचे रोजचे अनुभव ग्रथित केलेले दिसतात. त्यामुळे या गाथांमधून वाचकाला तत्कालीन सामाजिक संदर्भ समजण्यास मदत होते. तसेच या गाथा भावनाप्रधान असून शृंगाररसाबरोबरच शांतरस, रौद्ररस, करुणरस इ. रसांचा आणि वात्सल्याचा ही परिपोष झालेला दिसतो. या ग्रंथामध्ये सज्जन, दुर्जन, प्रेमभावना, नातेसंबंध अशा अनेक विषयांवर गाथा रचलेल्या आहेत. असे असले तरी स्त्रिया, त्यांचे मन(भावना), त्यांचे सामाजिक स्थान इ. गोष्टींचाही विशेष विचार गाथासप्तशतीमध्ये आढळतो.

गाथांचा सुभाषित म्हणून विचार करताना केवळ उपदेशपरवचन एवढाच मर्यादित विचार न करता सुभाषित म्हणजे 'चांगल्या प्रकारे सांगितलेले' असासुद्धा विचार करायला हवा. या व्याख्येनुसार सुंदर, नाविन्यपूर्ण कविकल्पना यांना सुद्धा सुभाषितच म्हणता येईल. गाथासप्तशती अशा सुंदर सुंदर कल्पनांनी भरलेली आहे. त्यांचा अभ्यास करणे हे सुद्धा वैशिष्ट्यपूर्ण ठरेल.

**(१ ते १० गाथा पाठांतरासाठी नेमल्या आहेत)**

### सज्जन

दढ-रोस-कलुसिअस्स वि सुअणस्स, मुहाहि विप्पिअं कत्तो।
राहु-मुहम्मि वि ससिणो किरणा, अमअं विअ मुअंति।।१।।

अवमाणिओ वि ण तहा दुम्मिज्जइ, सज्जणो विहव-हीणो।
पडिकाउं असमत्थो, माणिज्जंतो जह परेण।।२।।

कलहंतरे वि अविणिग्गआइं, हिअअम्मि जरमुवगआइं।
सुअण-कआइ रहस्साइं, डहइ आउ-क्खए अग्गी।।३।।

वसणम्मि अणुव्विग्गा, विहवम्मि अगव्विआ, भए धीरा।
होंति अहिण्ण-सहावा, समेसु विसमेसु सप्पुरिसा।।४।।

जीहाइ कुणंति पिअं, भवंति हिअअम्मि णिव्वुइं काउं।
पीडिज्जंता वि रसं जणंति, उच्छू कुलीणा अ।।५।।

### दुर्जन

उअअँ लहिऊण उत्ताणिआणणा, होंति के वि सविसेसं।
रित्ता णमंति सुइरं, रहट्ट-घडिअ व्व कापुरिसा।।६।।

उल्लावंतेण ण होइ, कस्स पास-ट्ठिएण ठड्ढेण।
संका मसाण-पाअव,-लंबिअ-चोरेण व खलेण।।७।।

### संकीर्ण

धण्णा बहिरा अंधा ते च्चिअ, जीअंति माणुसे लोए।
ण सुणंति पिसुण-वअणं, खलाणं रिद्धिं ण पेक्खंति।।८।।

ण गुणेण हीरइ जणो, जो जेण भाविओ तेण।
मोत्तूण पुलिंदा मोत्तिआइँ, गुंजाओँ गेण्हंति।।९।।

चावो सहाव-सरलं विच्छिवइ, सरं गुणम्मि वि पडंतं।
वंकस्स उज्जुअस्स अ संबंधो, किं चिरं होइ?।।१०।।

सव्वाअरेण मग्गह पिअं जणं, जइ सुहेण वो कज्जं।
जं जस्स हिअअ-दइअं, तं ण सुहं जं तहिं णत्थि।।११।।

जं जं आलिहइ मणो, आसावट्टीहिं हिअअ-फलअम्मि।
तं तं बालो व्व विही, णिहुअं हसिऊण पम्हुसइ।।१२।।

जे जे गुणिणो, जे जे अ चाइणो, जे विअड्ढविण्णाणा।
दारिद्द! रे विअक्खण!, ताणँ तुमं साणुराओ सि।।१३।।

## सद्दत्था

**दढ** – खूप, अतिशय, दृढ
**रोस** – क्रोध, राग
**कलुसिअस्स** – गढूळ झालेल्याचा, ग्रासलेल्याचा
**राहू** – पुराणातील एक ग्रह, राहू चंद्राला गिळतो म्हणून चंद्रग्रहण होते अशी पौराणिक आख्यायिका आहे. पण आधुनिक विज्ञानाच्या दृष्टीने सूर्य आणि चंद्राच्या मधोमध पृथ्वी येते आणि तिची सावली चंद्रावर पडते हे चंद्रग्रहण होय.
**अमअं** – अमृताला
**मुअंति** – बाहेर टाकतात
**ससी** – चंद्र
**दुम्मिज्जइ** – दु:खी होतो
**विहवहीण** – संपत्तिरहित, दरिद्री
**पडिकाउं** – परतफेड करण्यास
**माणिज्जंतो** – सत्कार केला जात असताना
**अविणिग्गआइं** – बाहेर न पडलेली, उघड न सांगितलेली
**हिअअम्मि** – अंत:करणात
**जरमुवगआइं** – वृद्ध झालेली
**रहस्साइं** – गुपिते
**आउक्खए** – मृत्यू झाल्यावर, मरणानंतर
**वसणम्मि** – संकटात
**अणुव्विग्गा** – खिन्न होत नाहीत, अनुद्विग्न
**अगव्विआ** – गर्विष्ठ नसतात, गर्वरहित
**अहिण्णसहावा** – स्वभावात बदल होत नाही, स्थितप्रज्ञ
**समेसु विसमेसु** – अनुकूल व प्रतिकूल परिस्थितीत
**जीहा** – जीभ
**णिव्वुइ** – आनंद, समाधान
**पीडिज्जंता वि** – पिळून काढले तरी
**उच्छू** – ऊस
**उत्ताणिआणणा** – तोंड वर केलेले
**रित्ता** – रिकामी (झाल्यावर)
**रहट्टघडिअ** – रहाटगाडगे
**कापुरिसा** – दुर्जन (बहुवचन)
**ठड्ढेण** – स्तब्ध झालेल्याकडून, न बोलता उभ्या राहिलेल्या
**मसाण** – स्मशान, अंत्यसंस्काराची जागा
**संका** – भीती
**पिसुणवअणं** – दुष्टांचे बोलणे
**रिद्धिं** – ऐश्वर्याला
**पुलिंदा** – शिकारी, व्याध (ब.व.)
**मोत्तिआइँ** – मोती (बहुवचन)

**विच्छिवइ –** (धनुष्य) फेकते
**वंकस्स –** वाकड्याचा, दुष्ट स्वभावाचा
**उज्जुअस्स –** सरळ स्वभावाचा
**मग्गह –** शोध घ्या
**हिअअ–दइअं –** मनाला भावणारे, आवडणारे
**आलिहइ –** विचारतो, रेखाटतो
**आसावट्टीहिं –** आशारूपी कुंचल्यांनी

**विही –** ब्रह्मदेव
**णिहुअं –** हळूच, गुपचुप
**पम्हुसइ –** पुसून टाकतो
**चाइणो –** त्यागी
**विअड्ढ–विण्णाणा –** शास्त्रनिपुण
**विअक्खण –** अरे हुशार, चतुर (रे दारिद्र्या)
**साणुराओ –** प्रेम करणारा

## सज्झाओ

**१) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) चंद्राच्या किरणांचे सज्जनांशी दाखवलेले साधर्म्य सांगा.
२) अंध व बहिरे कोणत्या गोष्टीसाठी धन्य आहेत.
३) मनुष्य अशावेळी प्रसन्न होतो.

**२) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) दारिद्र्याचे वर्णन करा.
२) पुलिंदाची उपमा स्पष्ट करा.

**३) सविस्तर उत्तरे द्या.**

१) पाठामध्ये सांगितलेली दुर्जनांची वैशिष्ट्ये लिहा.
२) पाठाच्या आधारे सज्जनांचे वर्णन करा.

**४) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) पीडिज्जंता वि रसं जणंति उच्छू कुलीणा अ ।
२) वंकस्स उज्जुअस्स अ संबंधो किं चिरं होइ?
३) तं तं बालो व्व विही, णिहुअं हसिऊण पम्हुसइ।

**५) पाठातून योग्य शब्द निवडून गाथा पूर्ण करा.**

१) सुअण–कआइ ......... डहइ ......... अग्गी ।
२).........मग्गह पिअं.........सुहेण वो......... ।
३) संका मसाण–पाअव–लंबिअ–चोरेण ......... ।
४) ........अणुव्विग्गा, विहवम्मि........,भए धीरा ।

**६) विषयानुरूप गाथा निवडून खालील तक्ता पूर्ण करा.**

अवमाणिओ वि ण तहा दुम्मिज्जइ सज्जणो विहवहीणो।,
रित्ता णमंति सुइरं रहट्ट–घडिअ व्व कापुरिसा।,
दारिद्द! रे विअक्खण! ताणँ तुमं साणुराओ सि।,
कलहंतरे वि अविणिग्गआइं हिअअम्मि जरमुवगआइं।,
ण गुणेण हीरइ जणो जो जेण भाविओ तेण।,
संका मसाण–पाअव–लंबिअ–चोरेण व खलेण।,
जं जस्स हिअअ–दइअं, तं ण सुहं जं तहिं णत्थि।,
ण सुणंति पिसुण–वअणं, खलाणं रिद्धिं ण पेक्खंति।

| सज्जन |
| --- |
| |
| |
| |
| |
| **दुर्जन** |
| |
| |
| |
| |
| **संकीर्ण** |
| |
| |
| |


**७) कंसातील योग्य शब्द निवडून समानार्थी–विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या लावा.**

(दुक्खं, दुज्जणो, अकुलीणा, जीवणं, हिअं)


| | |
|---|---|
| सज्जणो | |
| कुलीणा | |
| उअअं | |
| सुहं | |
| अहिअं | |

**८) समानार्थी शब्द योजून रेखाजाल पूर्ण करा.**

१)




२)




❋❋❋